दै.रजि.नं.
दाखल ता.१३-०२-२०२६

Exh- 1 / C

क्रि. किर. अर्ज. नं. 21 /२०२६

## मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल
## यांचे न्यायालयात....

**शकिल नजिर दरवेशी**
व.व. ३७, धंदा :- व्यापार व वाहतूक,
रा. मेन रोड, माळवाडी, कोगिल बु ॥,
ता. करवीर, जि. कोल्हापूर. } अर्जदार

वि

**महाराष्ट्र सरकार**
(कागल पोलिस स्टेशन) } वि. प.

Order
Issue Notice to opponent
and Call Say APP.
JMFC, Kagal
17/02/26

बी एन एस एस.कलम ५०३ प्रमाणे
मुददेमाल मागणी अर्ज....
कागल पो.स्टे. गु.र.नं. ३१ /२०२६
गुन्हा- म.प्रा.सं.का.क.५(अ),(ब) ९
प्रा.कु.वा.प्र.का.क.११(१)
मो.वा.का.क.६६/१९२.बी एन एस ३(५)

यातील अर्जदाराचा विनंती अर्ज की,

१) यातील अर्जदार यांचे मालकीचा खालील वर्णनाचा मुददेमाल महिंद्रा मॅक्स ट्रक कागल पोलिसांनी वर नमुद गुन्हयाचे कामी अर्जदार यांचे ताबेतून दि.०५-०२-२०२६ इ. रोजी जप्त केले आहे.

२) मुददेमालाचे वर्णन :-

महिंद्रा मॅक्स ट्रक

| | |
|---|---|
| रजिस्ट्रेशन नंबर | - एम एच ०९ सी यू १४३५ |
| रजिस्ट्रेशन तारिख | - २६/११/२०१३ |

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

| | |
|---|---|
| मेकर्स नेम | - महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. |
| मॉडेल | - बोलेरो मॅक्सी ट्रक एस टी डी २ डब्ल्यू बी एस ३ |
| बॉडी टाईप | - डिलीवरी व्हॅन |
| चेसिस नंबर | - MA1ZP2TAKD1K78177 |
| इंजिन नंबर | - TAD1K99776 |
| रंग | - पांढरा |
| अंदाजे किंमत | - रु.२,५०,००० /- |

३) येणेप्रमाणे वरील वर्णनाचा अर्जदार यांचे मालकीचा वर नमूद मुददेमाल कागल पोलिसांनी अर्जदार यांचे ताबेतुन जप्त केले आहे.

४) सदर मुददेमाल अर्जदार यांच्या कायदेशिर मालकीचे आहे. त्यामुळे खालिल कारणांचा विचार होवून सदर मुददेमाल वाहन यातील अर्जदार यांना परत करणेत यावा.

१) जप्त मुददेमाल वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे आहे. त्याच्या मालकीशी इतर कोणाचाही कसलाही हक्क संबंध अगर अधिकार नाही.

२) जप्त मुददेमाल वाहन हे अर्जदार यांच्या दररोजच्या वापरातील असून त्याच्या आधारेच अर्जदार माल वाहतुकीसाठी वापरत असतात. त्यामुळे सदर वाहन कागल पोलिस स्टेशनला तसेच पडून राहिल्यास अर्जदार यांचे नुकसान होणार आहे.

३) अर्जदार यांनी सदर मुददेमालाचा वापर कोणत्याही गुन्हयाचेकामी अथवा गैरकृत्यासाठी केलेला नाही. अथवा यापुढेही करणार नाहीत. सदर मुददेमालाचा सदर गुन्हयाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.

४) अर्जदार यांचे मुददेमाल वाहन हे गेल्या बऱ्याच दिवसापासून कागल पोलिस स्टेशन येथेच पडून आहे. सदर केस गुणदोषावर चालून निकाल होण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे ते तेथेच पडून राहील्यास पावसाळामुळे व हवामानातील बदलामुळे तो गंजून खराब होवून जाणार आहे व विना वापरामुळे इंजिन निकामी होणार आहे. त्यामुळे अर्जदार यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. तसेच यातील

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

अर्जदार यांच्या गाडीची देखभाल करण्याची अथवा ती व्यवस्थित ठेवण्याची गरज कागल पोलिसांना नाही. त्याची देखभाल करण्याची व ती वापरण्याचा हक्क यातील अर्जदार यांना आहे. तसेच अर्जदार हे सदर मुददेमालाचा अंतरिम ताबा मागत आहे. सदर केसच्या अंतिम निकालास अधिन राहण्याच्या अटीवर सदर मुददेमालाचा अंतरिम ताबा यातील अर्जदार यांच्याकडे देण्यास काहीही हरकत असण्याचे कारण नाही.

५) जप्त मुददेमाल वाहन परत मिळण्याकरीता अर्जदार योग्य त्या रक्कमेचा बॉड मे. कोर्टात देणेस तयार आहेत. व मे. कोर्ट घालतील त्या अटी पाळण्यास तयार आहेत.

६) जप्त मुददेमाल वाहन अर्जदार यांना बॉडवर परत दिल्यास ते त्याचा वापर कोणत्याही गैरकृत्यासाठी करणार नाहीत. अगर थर्ड पार्टीला विकणार नाहीत अगर त्याच्यात कोणताही बदल करणार नाहीत.

७) मे. कोर्ट हुकूम करतील त्यावेळी अर्जदार सदर मुददेमाल वाहन मे. कोर्टात हजर करण्यास तयार आहेत.

८) अशा प्रकारचा मुददेमाल मागणी अर्ज इतर कोणत्याही न्यायालयात दाखल अथवा प्रलंबित नाही.

९) सदर वाहनाचे रजिस्टशन प्रमाणपत्रावर अर्जदार यांचे पत्यामध्ये ता.कागल असे टायपिंगच्या चुकीमुळे पडले आहे. कागल तालुक्यामध्ये कोगिल बु.ाा हे गाव नसून ते करवीर तालुक्यामध्येच आहे.

तरी वरील सर्व कारणांचा विचार होवून सदर मुददेमाल वाहन अर्जदार यांना योग्य त्या रक्कमेचा बॉड घेवून परत करणेत यावे ही नम्र विनंती.

कागल. मे. जा. व्हावे.

ता. १३/०२/२०२६

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

प्रतिज्ञा

मी अर्जदार शकिल नजिर दरवेशी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील सर्व मजकूर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु. कागल.ता. ता. १३/०२/२०२६

ॲफिडेव्हीट

मी अर्जदार शकिल नजिर दरवेशी व.व.३७, धंदा :- व्यापार व वाहतूक, रा.मेन रोउ, माळवाडी, कोगिल बु ग, ता.कागल, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की, वरील अर्जातील सर्व मजकूर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट. आज मु. कागल.

ता. १३/०२/२०२६
मी ॲफिडेव्हीट करणार
यांना ओळखतो.

ॲड. मिलिंद. ज. पाटील.

प्रतिज्ञा

मी अर्जदार शकिल नजिर दरवेशी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु. कागल.

ता. १३/०२/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri Shakil Najir Darveshi
Age 37 of Kogil, Kagual who is
identified by Shri M. J. Patil Adv
.............whom I know personally
Dated :- 13/2/26

Assistant Superintendent

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.17 17:42:34 +0530

MADKE AJIT BHISHMA